divyamarathi.com

**सुविधा** | चौकशी खिडकीवरील गर्दी कमी करण्यासाठी महत्त्वाची योजना

# रेल्वेस्थानकावर पोएटद्वारे मिळणार गाड्यांची माहिती

प्रतिनिधी | चाळीसगाव

प्रवास करताना रेल्वेबद्दल अधिक माहिती जाणून घेणे प्रवाशांना आता अधिक सोपे होणार आहे. चाळीसगाव स्थानकावर काही दिवसांतच पोएट म्हणजेच पॅसेंजर ऑपरेटिंग सिस्टीम बसवण्यात येणार असून एकाच क्लीकवर प्रवाशांना भारतभरातील रेल्वेची सर्व माहिती मिनिटात मिळेल.

रेल्वे प्रवास करताना प्रवाशांना गाडीची वेळ, पोझिशन, तिकीट अशा विविध बाबी माहित होण्यासाठी मोठी डोकेदुखी ठरत असते. तसेच भारतभरातील काही गाड्यांची माहिती जाणून घेण्यासाठी रेल्वेच्या विविध यंत्रणेची मदत घ्यावी लागते. रेल्वेबद्दल सर्व माहिती जाणून घेण्यासाठी येत्या काही दिवसांतच चाळीसगाव रेल्वे स्टेशनवर पोएट ही आधुनिक प्रणाली बसवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील दुसरी ऑपरेटिंग सिस्टीम असणार असून योजना प्रवाशांना मोठी लाभदायक ठरणार आहे.

## कशी आहे पोएट सिस्टीम

जळगावनंतर पाचोरा व चाळीसगाव येथे पोएट सिस्टीम रेल्वे प्रशासनातर्फे बसवण्यात येईल. या सिस्टीममध्ये दोन बाय दीडचा डिस्प्ले असणार आहे. एकावेळेस एक व्यक्ती आपल्याला हवी असलेली माहिती ही सिस्टीम वापरून जाणून घेणार असून प्रवाशांची डोकेदुखी थांबणार आहे.

## प्रवाशांचा वेळ आणि पैसाही वाचणार; संपूर्ण संगणकीय प्रणालीद्वारे कामकाज




चौकशी खिडकीवर प्रवाशांची झालेली गर्दी.

## ६० हजार प्रवाशांची रोजची वर्दळ

**चाळीसगाव रेल्वेस्थानक हे नाशिक, औरंगाबाद, धुळे, मनमाड व मालेगाव अशा चार जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. तसेच चाळीसगाव येथून अनेक पर्यटनस्थळांना भेटी देणे सोईस्कर असल्याने पर्यटकांची चाळीसगाव रेल्वेस्थानकावर मोठी गर्दी होत असते. चाळीसगाव रेल्वेस्थानकावर दररोज ६० हजार प्रवाशांची वर्दळ असते. रेल्वेची दररोज साडेतीन ते चार लाखांची तिकीट विक्री होत असून नागरिकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी पोएट ही सिस्टीम अधिक गुणकारी ठरणार आहे हे मात्र निश्चि. चाळीसगाव स्थानकावर २३ गाड्यांना थांबा आहे. यात चार गाड्या चाळीसगाव ते धुळे पॅसेंजरच्या आहेत. या २३ गाड्यांमधून दररोज किमान ६० हजार प्रवासी ये-जा करतात. यात भुसावळ पॅसेंजर, धुळे पॅसेंजरने किमान २० प्रवासी येतात व जातात. ६० हजारांपैकी किमान २० हजार प्रवासी चौकशी खिडकीवर गाडीची विचारपूस करतात. त्यापैकी दरररोज १० हजार प्रवाशांनी जरी पोएट सिस्टीमचा वापर केला तरी तिकीट व चौकशी खिडकीवरील गर्दी कमी होईल, असा रेल्वे प्रशासनाचा अंदाज आहे. लवकरच ही सिस्टीम सुरू होईल.**

## काय आहे सिस्टीम ?

पोएट म्हणजे पॅसेंजर ऑपरेटिंग सिस्टीम या यंत्रणेव्दारे एकाच क्लीकवर भारतभरातील सर्व रेल्वेगाड्यांची माहिती मिळणार आहे. तसेच रेल्वेची पोझिशन, रेल्वेच्या आरक्षणाबाबतीत सर्व माहिती, फेअरची क्लासवाइज माहिती, दोन स्टेशनमधील गाडीचा टाइमटेबल, रेल्वेसाठी लागणारे विविध ठिकाणचे भाडे, अशी विविध माहिती एकाच क्लीकवर प्रवाशांना मिळणार आहे.

## तिकीट मशीन पडून

तिकीट खिडकीवरील प्रवाशांची गर्दी कमी होण्यासाठी तिकीट संग्रहालयात ॲटोमॅटीक तिकीट मशीन बसवण्यात आले आहे. त्यासाठी प्रवाशाला कार्ड देण्यात आले आहे. ते मोबाइल कार्डाप्रमाणे रिचार्ज करावे लागते. म्हणजे तिकीट खिडकीवर न थांबता एटीएमप्रमाणे तिकीट काढता येऊ शकते. मात्र, मशीन नेहमी बंद असते किंवा त्यातून कार्डधारकाला तिकीट काढणे शक्य होत नाही. त्यामुळे तिकीट खिडकीवरील गर्दीदेखील कमी होणार आहे.